# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील 'परिवहन सेवा' अधिक सक्षम करण्याबाबत

**(१) २२८३ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रवाशांची वाढती लोकसंख्या विचारात घेता महानगरपालिकेची 'परिवहन सेवा' अधिक सक्षम करावी अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रवाशांच्या संख्येत होणाऱ्या वाढीमुळे दळणवळणांची गैरसोय होत असून विनाकरण प्रवाशांना अतिरिक्त रक्कम खर्च करुन जीव धोक्यात घालून खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रवाशांचा प्रवास सुखकर व कमी खर्चात व्हावा, त्यांना वेळेत इच्छित स्थळी पोहचता यावे यासाठी सुसज्ज अशी परिवहन सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे

पनवेल महानगरपालिकेची स्वत:ची परिवहन सेवा अद्याप सुरु नाही. तथापि, पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये इतर परिवहन सेवांमार्फत जसे की बृहन्मुंबई महानगरपालिकेची बेस्ट सेवा, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम (NMMT), कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रम (KDMC) तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत सेवा पुरविली जाते. मनपा क्षेत्रातील परिवहन सेवा अधिक सक्षम करावी याबाबत पनवेल महानगरपालिकेकडे मागणी आढळून आली नाही. तथापि, पनवेल महानगरपालिकेकडे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम यांचेमार्फत नवीन बस सुरु करणे संदर्भात अर्ज प्राप्त झाले आहेत.
(२) हे खरे नाही.

(३) सद्य:स्थितीत पनवेल महानगरपालिका हद्दीत बृहन्मुंबई महानगरपालिकेची बेस्ट सेवा, नवी मुंबई महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच राज्य परिवहन मंडळ यांच्या तर्फे परिवहन सेवा पुरविण्यात येते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रवाशांचा प्रवास सुखकर व कमी खर्चात व्हावा व त्यांना वेळेत इश्चित स्थळी पोहचता यावे यासाठी सुसज्ज अशी परिवहन सेवा देण्याबाबत पनवेल महानगरपालिकेमध्ये प्रस्तावित असून या अनुषंगाने प्रकल्प सल्लागार नेमण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून यापूर्वीच सुरु करण्यात आलेली आहे.

सल्लागारांच्या प्रकल्प अहवालानुसार केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विहित मान्यता मिळाल्यानंतर परिवहन सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दक्षिण मुंबईतील ‘बी’ आणि ‘जी/दक्षिण’ विभागात पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(२) २३१६ (१७-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ‘बी’ आणि ‘जी/दक्षिण’ विभागातील अनेक भागांत सद्य:स्थितीत अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने स्थानिक रहिवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रत्यक्ष पाणी कपात केली नसतानाही ‘बी’ विभागातील भायखळा, नागपाडा, जे. जे. रुग्णालय आणि जी/दक्षिण विभागातील लोअर परळ येथील भारत मिल, वरळी येथील प्रेमनगर या झोपडपट्टी परिसरात अत्यंत कमी दाबाने पाणी येत असल्याने रहिवाश्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील पाणी टंचाईबाबत स्थानिक रहिवाशी, तसेच लोकप्रतिनिधी यांनी वारंवार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रारी दाखल केल्या असून तद्नुषंगाने दक्षिण मुंबईतील ‘बी’ आणि ‘जी/दक्षिण’ विभागातील नागरिकांना अनियमित दाबाने होत असलेला पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

भायखळा नागपाडा जे.जे.रुग्णालय हा परिसर ‘ई’ विभागाच्या अखत्यारीत येतो. दिनांक १२ मे, २०२५ रोजी व त्यासुमारास जे.जे.रुग्णालयास कमी पाणी पुरवठ्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच भायखळा आणि नागपाडा परिसरातून कमी पाणीपुरवठ्याबाबतच्या वैयक्तिक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व सदर तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे.

जी/दक्षिण विभागातील लोअर परल येथील भारत मिल व वरळी येथील प्रेम नगर या झोपडपट्टी परिसरात १२ मे,२०२५ रोजी व त्यासुमारास अत्यंत कमी दाबाने पाणी येत असल्याची तक्रार प्राप्त झाली नाही.
(३) नागरिकांकडून पाणीपुरवठाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास, स्थळ पाहणी करुन तसेच झडपांची योग्य प्रमाणात उघडझाप करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच पाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ पाणी गळती रोखण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरातील विद्रूपीकरण व अतिक्रमणामुळे नाशिक शहराच्या सौंदर्याला बाधा येत असल्याबाबत

**(३) २४१० (१८-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील मुंबई नाका ते द्वारका उड्डाणपुलाखालील असलेल्या अवैध निवासी विक्रेत्यांना हटविणेची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, नाशिक महानगरपालिका, पोलीस आयुक्त, नाशिक आणि प्रकल्प संचालक महामार्ग प्राधिकरण, नाशिक यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्रूपीकरणावर कार्यवाही न झाल्याने तसेच अतिक्रमणामुळे नाशिक शहराच्या सौंदर्याला बाधा येत असल्याने याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ मे २०२५ रोजी वा त्यासुमारास राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार केलेली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहरातील मुंबई नाका ते द्वारका उड्डाणपुलाखालील अतिक्रमण कायमस्वरूपी हटवून शहराचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक १५/०६/२०२५ ते दिनांक २०/०६/२०२५ पर्यंत सदर परिसरात अतिक्रमण निर्मूलन विशेष मोहिम राबवून नाशिक शहरातील मुंबई नाका ते द्वारका उड्डाणपुला खालील अतिक्रमण निर्मूलन कार्यवाही करण्यात आली तसेच सदर परिसरात नाशिक महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्या कामकाजाची चौकशी करण्याबाबत

**(४) २४१२ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या विविध गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.नगरविकास मंत्री महोदयांकडे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर शासनाने कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २१४ कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(५) २८५७ (१८-०७-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करुन त्यामध्ये रिक्त होणाऱ्या समकक्ष पदांवर सरळ सेवेने ७० टक्के व समावेशनाने ३० टक्के याप्रमाणे भरती करण्याबाबत शासन निर्णय असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेत २१४ कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात आलेले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत २१४ कर्मचारी बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असून त्यापैकी काही कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले असून उर्वरित कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत धोरण निश्चित न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उर्वरीत कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या निर्देशानुसार १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियांनातर्गत बृहन्मुंबई महागनगरपालिकेमध्ये कार्यरत ३ वाहन चालक या पदांचे समावेशन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील भाजीपाला मार्केटसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत

**(६) २८५९ (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगरपंचायत अंतर्गत पुर्नवसन टप्पा क्र. १ मध्ये डेली मार्केटसाठी आरक्षित जागेवर अतिक्रमण झाले असून भाजी विक्रीची दुकाने मुख्य रस्त्यावर आल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असून डेली मार्केटसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी विभागीय आयुक्त, नाशिक व जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी पत्र व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुक्ताईनगर नगर पंचायत अंतर्गत डेली मार्केटसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे,

मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणी मुक्ताईनगर नगरपंचायत हद्दीतील नगरपंचायतीच्या मालकीच्या गट नं.७०२ येथील ०.०५ हेक्टर इतके क्षेत्र भाजीपाला मार्केटसाठी आरक्षित करण्याबाबतचा प्रारुप शहर विकास आराखडा संचालक, नगररचना, पुणे यांच्याकडे मंजूरीकरीता सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील मैदाने खेळण्यासाठी खुली करण्याबाबत

**(७) २९९७ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात शिल्लक राहिलेली मैदाने ही खेळण्यासाठी उपलब्ध करून द्यावीत या मागणीकरीता नागरिकांनी आंदोलन केली असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीतील मैदानांची संख्या कमी न करता खेळण्यासाठी राखीव असलेली सर्व मैदाने खुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

श्री.संगम महादु डोंगरे यांनी दिनांक ०५ मे, २०२५ रोजी यांनी ठाणे शहरातील शिल्लक राहिलेली मैदाने ही खेळासाठी खुली करावीत, अन्यथा मुलांच्या भविष्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे सादर केले होते. मात्र प्रत्यक्षात

कोणत्याही प्रकारचे आंदोलन झालेले नाही.
(२) ठाणे महापालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार खेळासाठी आरक्षित असलेल्या सर्व मैदानांचा खेळासाठी जास्तीत जास्त वापर व्हावा याकरीता ठराव क्र. ७०४, दिनांक २६ मार्च, २०२५ अन्वये वर्षातील ३६५ दिवस मैदाने खेळासाठी खुली ठेवण्यात येतात. तसेच अपवादात्मक परिस्थितीत एकाच वर्षात ४५ दिवसांपेक्षा जास्त काळ या मैदानांचा वापर अन्य (धार्मिक/सामाजिक/ मनोरंजनात्मक) कार्यक्रमांसाठी करता येणार नाही असे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

तसेच उन्हाळी आणि दिवाळी सुट्टीच्या कालावधीत खेळासाठी आरक्षित खुली मैदाने अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यास मनाई करणारे आदेश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक ०९ जून, २०२५ रोजी पारित केले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोदवड (जि.जळगाव) तालुक्यातील बोदवड-मलकापूर रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

**(८) ३०३० (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोदवड (जि.जळगाव) तालुक्यातील बोदवड-मलकापूर रस्त्याच्या कामास मंजूरी असूनही दुरवस्था होऊन ठिकठिकाणी पडलेल्या खड्यांमुळे मोठा अपघात होवून जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बलवाडी-खिर्डी (ता.रावेर, जि.जळगांव) रस्त्याची दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयांमुळे एखादे वेळी मोठा अपघात होवून जीवित हानी होण्याची शक्यता असल्याने रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास ग्रामपंचायत सदस्य बलवाडी, ता.रावेर यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०२५ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोदवड-मलकापूर रस्त्याचे कार्यारंभ आदेश असूनही रस्त्याचे बांधकाम न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच बलवाडी-खिर्डी रस्त्याचे दुरुस्ती संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्ता नशिराबाद-सुनसगांव-कुऱ्हा- बोदवड-मलकापुर रामा-२७० चा भाग आहे. सदर रस्ता हायब्रीड ॲन्युटी टप्पा-२ अंतर्गत मंजूर असून दिनांक ०८/१०/२०२४ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर कामाची प्रगती निविदा शर्तीनुसार सुरु असून, रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्ता बलवाडी-खिर्डी, प्रजिमा ८७ सा.क्र. कि.मी ०/०० ते ४/००० आहे, सदर लांबी ही सद्य:स्थितीत दोषदायित्व कालावधीत असून सदर लांबीतील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतुकीस

सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम करणाऱ्या मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या २०० टक्के दंड आकारणी करण्याचा निर्णयाबाबत

**(९) ३०५८ (१७-०७-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत इमारतीमध्ये अंतर्गत रचनेत बदल करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या मालमत्ताधारकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मालमत्ता कराच्या २०० टक्के दंड आकारणी करण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयावर कधीपासून अंमलबजावणी होणार आहे, आतापर्यंत किती रक्कम वसुल करण्यात आली, सदर निर्णयानुसार कोणती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, आतापर्यंत किती मालमत्ता धारकांवर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १५२ अ मध्ये अनधिकृत बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार महानगरपालिकेडून अनधिकृत बांधकामाबाबत सूचना प्राप्त झाल्यानंतर सदर बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्यामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अधिनियमातील तरतूदीनुसार मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी दंड आकारणी करण्यात येते. आजमितीपर्यंत एकूण ३७७५ अनधिकृत मालमत्तांवर रुपये २७.९० कोटी इतकी दंड रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने गत वर्षी केलेल्या विकास कामांची देयके देण्यासाठी कर्ज काढल्याबाबत

**(१०) ३०६० (१७-०७-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत वर्षी करण्यात आलेल्या विकासकामांच्या ठेकेदारांची देयके देण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सुमारे रुपये १६,९०० कोटी एवढ्या रक्कमेचे कर्ज काढण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील आठ राज्यांमध्ये सर्वात जास्त बजेट असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर कर्ज काढण्याची वेळ येण्यामागची कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील भांडवली कामांच्या खर्चाचा वित्तप्रबंध करण्याकरीता महानगरपालिकेने निर्माण केलेल्या निधीतून रुपये १६,९०० कोटी रक्कमेचे अंतर्गत कर्ज घेण्यासाठी राज्य शासनाची पूर्व मंजुरी प्राप्त झाली आहे.परंतु अद्याप कर्ज उभारण्यात आलेले नाही.

(२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार अर्थसंकल्प ‘अ’, ‘ब’ आणि ‘ई’ च्या बाबतीत रुपये २६८८०.५६ कोटींचा भांडवली खर्च अपेक्षित होता व या आर्थिक वर्षात महसुली लेख्यातून अंशदान, विशेष निधीतील रक्कमेचा वापर व इतर प्राप्ती/अनुदान अशी मिळून एकूण भांडवली प्राप्ती रुपये १००२६.९८ कोटी इतकीच अपेक्षित होती. त्यामुळे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अपेक्षित असलेला रुपये २६८८०.५६ कोटींचा भांडवली खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्प ‘अ’ ला रुपये १६८५३.५८ कोटी इतक्या रक्कमेची कमतरता भासत होती. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील भांडवली कामांच्या खर्चाचा वित्तप्रबंध करण्याकरीता रुपये १६,९०० कोटी इतक्या रक्कमेचे अंतर्गत कर्ज महानगरपालिकेच्या निधीतून उभारण्यासाठी राज्य शासनाची पूर्व मंजुरी प्राप्त झाली आहे.

माहे जुलै २०२५ अखेरीस आर्थिक वर्षे २०२४-२५ संबंधित ताळेबंदाचे काम पूर्ण झाल्यावर अंतर्गत निधीमधून कर्ज उभारण्यासाठी किती रक्कमेची आवश्यकता आहे,त्यानुसार कर्ज उभारणीची रक्कम निश्चित होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील टॅंकर चालकांच्या मागण्यांबाबत

**(११) ३०६२ (१७-०७-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील टॅंकर चालकांनी आपल्या मागण्यांसाठी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजीपासून संप सुरु केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॅंकर चालकांच्या मागण्या काय आहेत, तसेच सदर मागण्यांबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, संप मिटविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नवीन कुपनलिका व कंगन विहीरी खोदण्याची परवानगी दिली जाते व अस्तित्वात असलेल्या सरफेस वेलचे पाणी पिण्याव्यतीरिक्त इतर वापरासाठी परवानगी दिली जाते. या अनुषगांने कीटकनाशक विभागामार्फत सर्व विहीर मालकांना CGWA चे ना-हरकत प्रमाण पत्र घेण्याबाबत प्रथमतः पत्र पाठवून सुचित करण्यात आले व पुरेसा अवधी देण्यात आला. मात्र ज्या विहीर मालकांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त केले नाही या विहीर मालकांविरूध्द बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३८१/३८१ अ अन्वये सुचना पत्रे बजावण्यात आली.

सदर विहीर मालकांना सुचना पत्र बजाविण्यात आल्या नंतर त्यांनी टँकर मालकांना विहीरीचे पाणी पुरविणे थांबविले. या अनुषगांने मुंबई वॉटर टँकर असोसिएशन यांनी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी पासून संप पुकारला. यामध्ये महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या कायदेशीर कारवाया थांबविण्यात याव्यात व केंद्रीय भुजल प्रधिकरण (CGWA) यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली.

(३) संप मिटविण्याच्या दृष्टिने मुंबई वॉटर टँकर असोसिएशनच्या सदस्यांसोबत दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त स्तरावर सभा घेण्यात आली होती. सदर सभेदरम्यान मुंबई वॉटर टँकर असोसिएशन यांनी केंद्रीय भूजल प्राधिकरण यांच्या अटींचे पालन करावे असे निर्देश देण्यात आले. तसेच मुंबई वॉटर टँकर असोसिएशन यांच्या अडचणी व मागण्यांबाबत जल शक्ती मंत्रालय, केंद्रीय भूजल बोर्ड या प्राधिकरणांना महानगरपालिकेच्या वतीने कळविण्यात आले असे स्पष्ट करण्यात आले.

सदर मागण्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दिनांक ३० मे, २०२५ अन्वये केंद्रीय जल शक्ती मंत्रालय, केंद्रीय भुजल मंडळ (CGWB), इत्यादी यांना पत्रे पाठविण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एरंडोल व जामनेर (जि.जळगाव) महानगरपालिकेच्या एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत मंजूर घरकुल योजना अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२) ३०८० (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल व जामनेर (जि.जळगाव) महानगरपालिकेच्या एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत मंजूर घरकुल योजना गत १५ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च होवूनही गत १५ वर्षापासून योजना अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) जामनेर नगरपरिषदेचा एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत एकूण १२३८ घरकुलांचा प्रस्ताव मंजूर असून सदर घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. सदर घरकुलांपैकी ११०४ घरकुलांचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित १३४ घरकुलांची अंतर्गत कामे प्रलंबित असल्याने, वाटप करण्यात आलेले नाही. सदरचे काम पूर्ण करुन उर्वरित घरकुलांचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच एरंडोल नगरपरिषदेची एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत मंजूर २८८ घरकुलांपैकी सन २०१५ पर्यंत ७२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित घरकुलांचे काम सुरु

होते. सदरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आल्याने संबंधित ठेकेदाराकडून काम काढून घेण्यात आले. सद्य:स्थितीत घरकुल बांधण्याचे काम बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी तिकिट दर दुप्पट वाढविण्याच्या प्रस्तावातून दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी यांना वगळण्याबाबत

**(१३) ३०९८ (१७-०७-२०२५) श्री.सचिन अहिर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी तिकिट दर दुप्पट वाढविण्याच्या प्रस्तावाला बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिल्यानंतर सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य मार्ग परिवहन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी इत्यांदीना भाडेवाढीतून वगळण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णय घेतला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, मुंबईत सर्वसामान्य मुंबईकरांसाठी परवडणारी वाहतूक हे बेस्टचे मूळ उद्दीष्ट असताना गेल्या दशकात मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीचा खर्च २१ टक्केनी वाढला असून बेस्ट बसच्या भाड्यात ३० टक्क्यापर्यंत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सन २०२३-२४ च्या आर्थिक सर्व्हेक्षणाचे निष्कर्ष लक्षात घेवून गरीब व मध्यमवर्गीय प्रवाशांवर पडणारा आर्थिक बोजा कमी करण्यासाठी आणि बेस्ट सेवेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत उपक्रमाच्या बससेवांवर दिव्यांग व्यक्ति, ज्येष्ठ नागरीक, शालेय विद्यार्थी खाजगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यमान सवलतीच्या दरात बसपास उपलब्ध आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ०९ मे २०२५ पासून प्रवासभाड्याच्या सुसूत्रिकरणाच्या माध्यमातुन झालेल्या भाडेवाढीत दिव्यांग व्यक्ति, शालेय विद्यार्थी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बसपासच्या मुल्यामध्ये तसेच सवलतिच्या भाड्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

प्रवासभाड्याच्या सुसूत्रिकरणामध्ये ज्येष्ठ नागरिकाकरीता प्रौढ भाडे आकारण्यात येते व प्रतिमाह बसपासमध्ये रुपये ५०/-इतकी सवलत देण्यात येत आहे.

(३) दिनांक ०९ मे २०२५ पासून उपक्रमाचा संचित तोटा कमी करून महसूलात वाढ करण्यासाठी आणि जास्तीत जास्त प्रवाशांना वक्तशीर, आरामदायी उपक्रमाच्या बससेवेचा लाभ घेता यावा याकरीता सन २०१९ नंतर बेस्ट उपक्रमाच्या प्रवासभाड्याचे सुसूत्रिकरण करण्यात आले आहे. यामध्ये विना

वातानुकूलित व वातानुकूलित बसगाड्यांचे अनुक्रमे किमान प्रवासभाडे रुपये ५/- वरून रुपये १०/- व रुपये ६/-वरून रुपये १२/- करण्यात आले आहे.

(४) बेस्ट उपक्रमाची बससेवा जास्तीत जास्त प्रवासीभिमूख होण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने प्रयत्न सुरु आहेत.

बेस्ट उपक्रमाला सन २०१९ पासून स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आर्थिक सहाय्य प्राप्त होत आहे. महानगरपालिकेकडून याकरीता अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद देखील करण्यात येत आहे.

अर्थात उपक्रमाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी बेस्ट प्रशासन देखील महसूलवाढी करीता प्रयत्न करीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील गिरण्यांचा इतिहास पर्यटकांनी अनुभवण्यासाठी टेक्स्टाइल संग्राहलय उभारण्याबाबत

**(१४) ३१२० (१७-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, अॅड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळाचौकीतील दि इंडिया युनायटेड मिल क्रमांक २ व ३ च्या ४४,००० चौ.मी. जागेवर काळाचौकीतील बहुचर्चित टेक्सटाइल म्युझियम अर्थात वस्त्रोद्योग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र उभारणीचे काम गत सात वर्षापासून प्रलंबित असून हे पर्यटन संग्रहालय मुंबईकर व अन्य पर्यटकांसाठी अद्याप खुले झाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहराची विशेषता परळ, लालबाग, भायखळा, काळाचौकी, दादर, नायगाव व अन्य भागाची गिरणगाव म्हणून आजही ओळख असताना आता गिरण्यांच्या जागी व्यावसायिक इमारती उभारल्या जात असून मुंबईतील कापड गिरण्यांचा इतिहास भावी पिढीला समजावा यासाठी राज्य शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या पुढाकारानेमुंबईतील मध्यवर्ती भागात असलेल्या काळाचौकी येथील इंडिया युनायटेड मिलच्या भूखंडावर वस्त्रोद्योग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र उभारण्यासाठी पहिल्या टप्प्याच्या कामाला सदर प्रस्तावास "मुंबई संस्कृती वारसा जतन समिती" ची ना-हरकत दिनांक ११ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास होऊनही अद्याप सदर कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या इंडिया मिल नं. २ व ३ येथील माझगांव विभागातील न.भू.क्र. ८३१ (भाग) भूभागावर तीन टप्प्यांत करण्यात येत असून, टप्पा क्र. १ चे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, तसेच टप्पा क्र. २ व ३ मध्ये "टेक्स्टाईल म्युझियम" (कापड गिरणी संग्रहालय) च्या सध्याच्या परिस्थितीच्या अनुषंगाने संरचनात्मक परिक्षण अहवाल तयार करुन सुधारित आराखडा व निविदा प्रक्रिया लवकरात लवकर राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या इंडिया मिल नं. टप्पा क्र. २ व ३ साठी आवश्यक भूखंडाची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली नसून सदर भूखंड बृहन्मुंबई

महानगरपालिकेच्या नावे मालमत्ता पत्रकात हस्तांतरीत करण्याच्या सुरु असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य: स्थिती काय आहे,
(५) असल्यास, सदर भूखंडावरील पुरातन वास्तुंचे संरचनात्मक परिक्षण करुन सुधारित आराखडा तयार करण्यात करुन सदर आराखड्यास पुरातन वास्तुजतन समितीचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन अंदाजपत्रक निविदा प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली,वा करण्यात येते आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) मुंबईतील काळाचौकी येथील दि इंडिया युनायटेड मिल क्रमांक २ व ३ च्या ४४,००० चौ. मी. जागेवरील प्रस्तावित वस्त्रोद्योग संग्रहालयाचे टप्पा क्र.१ चे काम अंतिम स्तरावर असल्यामुळे अद्याप पर्यटकांसाठी खुले करण्यात आले नाही.
(२) व (३) भायखळा (पूर्व) येथील इंडीया युनायटेड मिल नं.२ व ३ च्या ४४,००० चौ.मी. भुखंडावर वस्त्रोद्योग संग्रहालयाचे काम प्रस्तावित आहे. सदर काम हे दोन टप्प्यात करण्यात येत आहे. टप्पा क्र. १ (७,००० चौ.मी.) अंतर्गत, नागरिकांच्या मनोरंजनाकरीता उद्यान व मुंबई गिरणीचा इतिहास लोकांपर्यंत पोहचविण्याकरीता संगीत कारंजे व ध्वनीचित्र प्रणाली, खाद्यपदार्थ व इतर दुकाने इ. ची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी पायाभूत सुविधा व उद्यानचे काम टप्पा क्र.१ (भाग १ व २) अन्वये पूर्ण करण्यात आले असून संगीत कारंजे व ध्वनीचित्रप्रणालीदेखील, सदर कामाबाबत अनुभव असणाऱ्या विशिष्ट संस्थेची नेमणूक करुन, पूर्ण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत जनतेकरीता सादर करावयाच्या संगीत कारंजे शोचे चाचणी परिक्षण सुरु आहे व ते लवकरात लवकर सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच सदर ठिकाणी माहितीचिन्हे व फलक आणि भित्तीचित्र तयार करण्याकरीता कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे.

संगीत कारंजे व ध्वनीचित्रप्रणाली शो कार्यान्वित करण्याकरीता लागणारी तिकिट यंत्रणा व ऑनलाईन व्यवस्था विकसीत करण्याकरीता तसेच परिसराचे सर्वकष परिरक्षण व साफसफाई करण्याकरीता इ. कामांचे विविध प्रस्तावावर प्रशासकीय मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

टप्पा क्र.२ करीता प्रकल्प सल्लागार मे.स्ट्रक्टवेल डिझायनर्स व कन्सलंटटस प्रा.लि यांनी मसुदा निविदा तयार करुन माहे जून, २०२५ मध्ये सादर केली आहे.
(४) वस्त्रोद्योग संग्रहालयासाठी राखीव भुखंडाचा अग्रीम ताबा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिला असून सदर जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर करण्याबाबतची प्रक्रिया राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून सुरु आहे.
(५) संरचनात्मक सल्लागार मे.स्ट्रक्टवेल डिझायनर्स व कन्सलंटटस प्रा.लि यांनी संरचनात्मक परिक्षण अहवाल माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये सादर केला असून त्यांची प्रकल्प सल्लागार अशी नेमणूक करण्यास दिनांक ०२/०५/२०२५ अन्वये मंजूरी प्राप्त करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. मे.स्ट्रक्टवेल डिझायनर्स व कन्सलंटटस प्रा.लि यांनी मसुदा निविदा तयार करुन माहे जून, २०२५ मध्ये सादर केली आहे.

तथापि, आता सदर टेक्सटाईल म्युझियम कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड (CSR Fund) अंतर्गत विकसित करुन २० वर्षाच्या कालावधीकरीता प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता प्रतिष्ठीत खाजगी

कंपनी/ चॅरिटेबल ट्रस्ट किंवा सोसायटी यांच्याकडून Expression of Interest मागविण्याकरीता जाहिरात प्रसारित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर शहरासाठी नव्याने सुरू केलेली पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(१५) ३२९४ (१८-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरासाठी नव्याने सुरू केलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे नागरिकांना प्रचंड पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना माहे जुलै मध्ये पूर्ण करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात डिसेंबर महिन्यापर्यंत पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची नवीन पाणीपुरवठा योजना जलद गतीने पूर्ण करुन पाणीपुरवठा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०३-२०२६) :** (१), (२), (३) व ४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील पाईपलाईन अंथरण्याच्या कामातील अडचणी, विविध विभागांच्या आवश्यक असणाऱ्या परवानग्या, जलकुंभाच्या जागा मिळण्यास झालेला विलंब व इतर तांत्रिक अडचणीमुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील पाणीपुरवठा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी मा.उच्च न्यायालय तसेच, मा.उच्च न्यायालयामार्फत गठित समितीमार्फत दर पंधरा दिवसांनी सविस्तर आढावा घेऊन सनियंत्रण केले जाते तसेच, प्रकल्पाच्या प्रगतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाची ८२ % भौतिक प्रगती झाली असून प्रकल्पातील कामे माहे डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करून प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

---

## मुंबईत बोअरवेल खोदण्यासाठी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) ३३२१ (१७-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील विविध गृहसंकुलांना महानगरपालिका बोअरवेल खोदण्यासाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने काही नियमावली तयार केली आहे काय, तसेच बोअरवेल खोदण्यास महानगरपालिकेडून निधी उपलब्ध करून देताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विचारात घेण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, बोअरवेल खोदण्याकरीता पर्यावरणदृष्ट्या नैसर्गिक पाण्याचे स्रोत वापरण्यास मर्यादा निश्चित करुन बोअरवेल्सवर मीटर बसवून पाणी वापरावर मर्यादा व कर आकारणी करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमावली तयार केली नाही.
(३) सदर बाबत केंद्रीय भूजल प्राधिकरण यांनी अधिसुचना क्र.एसओ/३२८९ (ई) दिनांक २४/०९/२०२० अन्वये नियम व अटी जाहीर केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या थकीत जल देयकाच्या वसुलीबाबत

**(१७) ३३२२ (१७-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने थकीत पाणी बिल वसुलीसाठी अभय योजनेच्या माध्यमातून विशेष सवलत देऊनही मुंबईकरांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपये थकविले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अभय योजना राबविण्याबाबत योग्य ती जनजागृती किंवा प्रसिद्धी करण्यात आली आहे काय, जनजागृती व प्रसिद्धीचे स्वरूप काय होते आणि त्यासाठी किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, थकीत पाणी बिल प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने अभय योजनेला प्रतिसाद न मिळाल्याने वसुलीसाठी कोणती कार्यवाही केली त्याचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, थकीत पाणी बिल न भरणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने थकीत जलदेयक वसुलीसाठी अभय योजनेच्या माध्यमातून दिनांक १५/०२/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२५ या कालावधीत महानगरपालिकेकडून विशेष सवलत देण्यात आली होती. दिनांक ०१ एप्रिल,२०२५ रोजी अभय योजना संपुष्टात आल्यानंतर एकूण रुपये ३६३९.२० कोटी इतकी थकबाकी प्रलंबित होती.
(२) होय,सदर योजनेबाबत जनजागृती व प्रसिद्धीचे स्वरुप खालीलप्रमाणे होते:-
१) अभय योजनेबाबत स्थानिक भाषांमधील विविध वृत्तपत्रातून जाहिरात देण्यात आली.

(२) झी वाहिनीच्या झी मराठी,झी टॉकीज आणि झी २४ तास या तीन वाहिन्यावर सन २०२१ मध्ये तळटीप स्वरुपात जाहिरात प्रसारित केली.
वरील अनुक्रमांक १ व २ बाबत जनसंपर्क विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून एकूण रुपये १९,६२,६००/-इतका खर्च करण्यात आला.
(३) भारत सरकारच्या टपाल विभागाद्वारे जलदेयके वितरीत केल्या जाणाऱ्या लिफाफ्यावर नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घेण्याबाबत संदेश छापण्यात येत होता.
४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध वाहनांवर 'अभय योजनेचे' बॅनर्स/स्टिकर्स लावण्यात आले.सदर स्टिकर्स महानगरपालिका मुद्रणालयाकडून छापून तयार करण्यात आले.
(३) ग्राहकाने देय दिनांकापर्यंत जल देयकाचे अधिदान न केल्यास प्रचलित पध्दतीनुसार ग्राहकास सूचना देऊन विभाग स्तरावर जलजोडणी खंडीत करण्यात येते दिनांक ०१ एप्रिल,२०२५ ते आजतागायत सर्व विभाग स्तरांवर मिळून एकूण ३५० इतक्या जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या असून एकूण रुपये ६४.४७ कोटी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना कायमस्वरूपी स्टॉल देण्याबाबत

**(१८) ३३९१ (१८-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना कायमस्वरूपी स्टॉल मिळवून देऊ असे आश्वासन मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री महोदयांनी पत्रकारांच्या एका कार्यक्रमाप्रसंगी दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना कायमस्वरूपी स्टॉल देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रामध्ये केंद्र शासन द्वारा दिनांक १ मे २०१४ रोजी लागू करण्यात आलेला पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट,२०१६ रोजी प्रसिध्द केलेले महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्री विनियमन) नियम, २०१६ व मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजी निर्गमित केलेली पथविक्रेता योजना या मार्गदर्शक प्रारुप विचारात घेऊन पथ विक्रेता योजना तयार करुन पथ विक्रेता धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगरोत्थान योजनेंतर्गत स्वामित्व धनाची १० टक्के रक्कम भरणा करण्याबाबत

**(१९) ३३९९ (१७-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरोत्थान योजनेंतर्गत राज्यात गत वर्षी किती रक्कमेची तरतूद करण्यात आली होती व त्यापैकी “ड” महानगरपालिकांकरीता किती रक्कमेची तरतुद शासनाकडून करण्यात आली आहे,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार “ड” वर्ग महानगरपालिकांना स्वामित्व धनाच्या ३० टक्के रक्कम भरण्याचे महानगरपालिकांवर बंधनकारक असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर “ड” वर्ग महानगरपालिकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने ३० टक्के रक्कमेऐवजी १० टक्के इतकी रक्कम भरण्याबाबत सदर महानगरपालिकांमार्फत तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत शासनाकडे त्या सुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार “ड” वर्ग महानगरपालिकांच्या मागणीनुसार २० टक्केऐवजी १० टक्के इतकीच रक्कम भरण्याबाबतची सदर अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०३-२०२६) :** (१) नगरोत्थान योजनेंतर्गत मागील आर्थिक वर्षात (सन २०२४-२५) महानगरपालिका खालील लेखाशीर्षात रुपये ६०० कोटी आणि नगरपरिषद / नगरपंचायत करीताच्या लेखाशीर्षात रुपये १८०० कोटींची तरतूद करण्यात आली होती.

सदर योजनेंतर्गत करण्यात येणारी वित्तीय तरतूद ही महानगरपालिका आणि नगरपरिषद / नगरपंचायत अशा दोन स्वरूपात करण्यात येत असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वर्गनिहाय करण्यात येत नाही.

(२),(३), (४) व (५) नगरोत्थान महाभियानाची सुधारित स्वरूपात अंमलबजावणी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सुरू आहे.

सदर शासन निर्णयान्वये या अभियानांतर्गत “ड” वर्ग महानगरपालिकांच्या प्रकल्पांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा ३० % निश्चित करण्यात आलेला आहे.

सदर अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वर्गनिहाय वित्तीय आकृतीबंधाबाबतचा निर्णय हा मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतला असल्यामुळे यामध्ये बदल करता येणार नाही.

---

## अमरावती शहरातील रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्यानजीक राष्ट्रीय महामार्गालगत साठविण्यात आलेल्या राखेमुळे त्रास होत असल्याबाबत

**(२०) ३४२५ (१७-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमाराच्या पत्राच्या अनुषंगाने उड्डाणपुलाचे बांधकाम जनरल मॅनेजर तथा प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरीटी ऑफ इंडिया यांचेद्वारा अमरावती शहरातील रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्या नजीक(जि.अमरावती) सुरु असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाची पाहणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाहणीत महामार्गालगत असलेल्या शिवमंदिराचे विरुध्द दिशेने अंदाजे १ एकर जागेवर योग्य ती उपाययोजना न करता राखेची (Fly ash) साठवणुक केली असून याकरीता तेथील वृक्षाची अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्यामुळे त्याठिकाणी आता १० वृक्षांची वाढलेली खोड असल्याचे दिसुन येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साठवणुक केलेल्या राखेच्या धुलिकणांमुळे हवा प्रदूषित होत असून परिसरातील नागरिकांना व महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने डोळयात राखेचे धुलीकण जाऊन अपघात होऊन जिवीतहानी होण्याची तसेच नागरिकांना श्वसनाचे आजार होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जनरल मॅनेजर तथा प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरीटी ऑफ इंडिया द्वारा झालेल्या निष्काळजीपणा व अवैध वृक्षतोड बाबतची दखल घेऊन गुन्हा दाखल करण्यात यावा, असे पोलीस निरीक्षक, नांदगांव पोलीस ठाणे, जि.अमरावती, यांना मनपा, अमरावती यांनी लेखी कळवून देखील त्याबाबत पोलीस दलाकडून कारवाई करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने संबंधित पोलीस निरीक्षक, नांदगांव पेठ व प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरीटी ऑफ इंडिया यांचे विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२७-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे,

धुळे-जळगांव-खामगांव-अमरावती-नागपूर-भंडारा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ असून, सदर महामार्गावरील रहाटगाव येथील रिंग रोड टी जंक्शनवरील (कि.मी.१४७/३००) अपघातप्रवण स्थळावर दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून भुयारी मार्ग बांधकामाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.
(२) नाही, हे खरे नाही,
राखेची (Fly ash) साठवणूक करण्याकरीता वापरलेल्या जागेत कोणतीही वृक्षतोड करण्यात आलेली नाही. तसेच भुयारी मार्गाच्या कामात अडथळा देणारी झाडे अमरावती महानगरपालिकेची रितसर परवानगी घेऊन, तसेच सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) जमा करुन तोडण्यात आलेली आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (MORT& H) दिनांक २६/०९/२०२३ च्या परिपत्रकानुसार, राखेचा (Fly ash) वापर रस्ता बांधकामासाठी अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्याला अनुसरून भरावासाठी राखेचा (Fly ash) वापर करण्यात येत आहे. पावसाळ्यात भरावासाठी राखेचा तुटवडा होऊ नये म्हणून संबंधित ठेकेदाराद्वारे रहाटगावजवळच वडगाव माहोरे येथे राखेची साठवणुक केलेली आहे. सदर ठिकाणी हवा प्रदूषण न होण्याचा दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या

आहेत. राख पूर्णतः हिरव्या जाळीने झाकणे, नियमितपणे पाण्याची फवारणी (Sprinkling) करणे इ. तसेच राखेच्या सभोवतालच्या मातीला आद्र करुन राख उडून प्रदूषण होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.

(४) हवा प्रदूषण होऊन परिसरातील नागरिकांना व महामार्गावरील वाहतूकीस अडथळा निर्माण होत असलेबाबत शहर अभियंता, अमरावती महानगर पालिका यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ३/०६/२०२५ रोजी उड्डाणपूलाच्या बांधकामाचे कॉन्ट्रक्टर यांचे विरुध्द नांदगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.